**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/सीएसएस/२०१७-१८/20828 दिनांक : ०८.०९.२०१७

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ च्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : - १. केंद्र शासनाचे पत्र क्र. १/२०१७-एन एस-१(एनएसपी) दि. २८.०७.२०१७.
२. मा. शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं-२०१७/सीएसएस/शिष्यवृत्ती/१०६१३ दि. ७.९.२०१७
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. १-४४/२०१७-एन एस-१(एनएसपी) दि. ७.९.२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०१७ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीसाठीचे नविन (Fresh) व ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी सन २०१६ मध्ये नुतनीकरण ऑनलाईन (Renewal) पध्दतीने अर्ज केला असेल त्यांचे सन २०१७ मध्ये (First Renewal) आणि (Second Renewal) नुतनीकरणासाठीचे अर्ज हे ऑनलाईन पध्दतीने आणि उर्वरित नुतनीकरणासाठीचे (Third Renewal) आणि (Fourth Renewal) (तृतीय आणि चतुर्थ ) नुतनीकरणासाठीच्या विद्यार्थ्यांनी केलेले अर्ज हे ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

**केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.** तसेच अतिरिक्त माहिती मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन व सुधारित प्राप्त होणा-या सूचनांसाठी www.scholarships.gov.in आणि www.dhepune.gov.in व www.jdhepune.info या संकेतस्थळाचे अवलोकन महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी तसेच विद्यार्थ्यांनी करण्याबाबत सूचना दिलेली आहे.



**नवीन मंजुरी (Fresh) तसेच प्रथम (1ST Renewal) व द्वितीय नुतनीकरण (2ND Renewal) ऑनलाईन अर्ज (Online Renewal)**

१. शिष्यवृत्तीच्या नवीन मंजुरी आणि प्रथम व द्वितीय नुतनीकरणासाठी (Fresh, 1ST Renewal & 2ND Renewal) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत केंद्रशासनाने दि. ३०.१०.२०१७ अशी निर्धारित केलेली आहे.
२. ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Renewal Top 20th Percentile merit list मध्ये समावेश आहे, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
३. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधार क्रमांक हा त्याच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.
४. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी पैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.
५. नवीन मंजूरीचा तसेच प्रथम व द्वितीय नुतनीकरणाच्या ऑनलाईन अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.
६. तसेच संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या सी.एस.एस. शिष्यवृत्तीबाबत सूचनांचे अवलोकन करावे.
७. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय/संस्थेने छाननी करुन त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करावे. अंतिम मुदतीची वाट पाहू नये.

**शिष्यवृत्तीचे नुतनीकरण - तृतीय नुतनीकरण (3rd Renewal) व चतुर्थ नुतनीकरण (4th Renewal) ऑफलाईन अर्ज (Offline Renewal)**

१. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी मागील वर्षीच्या परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
२. तृतीय व चतुर्थ नुतनीकरणासाठी (3rd Renewal & 4th Renewal) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावा व परिपुर्णरित्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयाकडे दिनांक २०/१०/२०१७ पर्यंत जमा करावा.



३. विद्यार्थ्यांनी ऑफलाईन जमा केलेले अर्ज महाविद्यालय/संस्थेने छाननी करुन त्वरीत दिनांक ३०.१०.२०१७ पर्यंत सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयाकडे जमा करावेत. अंतिम मुदतीची वाट पाहू नये.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१७-१८ मार्गदर्शक तत्वाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. विभागांतर्गत असणा-या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी व बँकखाते आधार संलग्न करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अर्जदाराच्या सोयीसाठी मार्गदर्शक सुचना व अर्जाचा नमुना अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करयात आलेला आहे.

सर्व महाविद्यालयांनी / संस्थाप्रमुखांनी सर्व विद्यार्थ्यांना आधार कार्ड काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून महाविद्यालयात कॅम्प आयोजित करावेत. त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी गांभीर्याने दक्षता घ्यावी.

(डॉ. [illegible] नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रत -
१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
४. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
५. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
७. प्राचार्य, वैद्यकीय महाविद्यालये.
८. प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये.
९. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे.
१०. मा. उप संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
११. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.